नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/01/2024 (शुक्रवार) दुपार

---

## पर्यावरणास अपायकारक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कार्यवाही

शासनाकडून प्रतिबंधीत नायलॉनचा सरास वापर होत असल्यामुळे मा. पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी सर्व प्रभारी ठाणेदार यांना नायलॉन मांजावर कायदेशीर कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्या अनुशंगाने विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नायलॉन मांजाची विक्री आणि वापर करणाऱ्या इसमांविरूद्ध कारवाई करण्यात आलेली आहे ते खालीलप्रमाणे आहे.

दिनांक ११/०१/२०२४ रोजी पोलीस स्टेशन केळवद हद्दीत स्टॉफ पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरे वरुन मौजा केळवद बाजार चौक मध्ये **आरोपी नामे— सिराज शेख रा. वार्ड क्र ०१ केळवद** याचे ताब्यातून पर्यावरणास अपायकारक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा मिळून आला. आरोपीचे पतंगाचे दुकानाची कायदेशिर झडती घेतली असता त्याचे काउन्टरचे खाली एका पांढरे रंगाचे प्लास्टीक बोरीमध्ये १) MONO KITE नायलॉन मांजाचे २१ नग मोठी चक्री प्रत्येकी किंमती १०००/—रू प्रमाणे किंमती २१,०००/— रुपये, २) GOLD नायलॉन मांजाचे १४ नगे मोठी चक्री प्रत्येकी किंमती १०००/—रू. प्रमाणे किंमती १४,०००/— रुपये, ३) ३ नग नायलॉन मांजाची लहान चक्री प्रत्येकी किंमती अंदाजे ५००/—रू. प्रमाणे किंमती १,५००/— रुपये असा एकुण किंमती ३६,५००/— रू चा मुद्देमाल नायलॉन मांजा मिळुन आल्याने आरोपीविरुद्ध पो.स्टे ला कलम ५, १५ पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ सह कलम १८८ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच पोस्टे अरोली हद्दीत मौजा कोदामेंढी येथे दिनांक १०/०१/२०२४ रोजी फिर्यादी यांना गूप्त बातमीदारां कडुन खबर मिळाली की, **आरोपी नामे—राजा सलाम शेख, वय २७ वर्ष, रा. वार्ड नं. ३ कोदामेंढी ता. मौदा** याचे राहते घराची झडती घेतली असता, घराचे हॉलमधील एका टेबल वरील पंतगच्या बाजूला पर्यावरणास अपायकारक असणारा प्रतिबंधक नायलॉन मांजा मिळून आला. त्याने सदर मांजा हा पंतग उडविण्या करीता आणले होते असे सांगितले. तसेच त्यास सदरचा नायलॉन मांजा कोठून आणला होता याबाबत विचारपुस केली असता त्याने दोन वर्षी पतंग उडविण्या करीता नागपूर येथील गांधीबाग परिसरातून एका दुकानातून तो नायलॉन मांजा आणले होते. परंतु त्या दुकानाचे नाव व पुर्ण पत्ता त्याला माहीती नसल्याचे सांगितले. आरोपीकडुन १) एक लाकडी दांडा व काळया रंगाचे प्लॅस्टीक चक्रीत गुंडाळलेला काळया रंगाचा प्रतिबंधक नायलॉन मांजा ०१ नग किंमती ६,००/—रू. मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर **आरोपी राजा सलाम शेख वय २७ रा. कोदामेंढी ता. मौदा** याने शासनाने नायलॉन मांजा बाळगण्यास व वापरण्यास बंदी घातलेली असतांना सुध्दा शासनाने मनाई आदेशाचे उल्लघंन करून नायलॉन मांजा पतंग उडविण्या करीता बागळून मिळून आल्याने त्याचे विरूध्द कलम १८८ भा.दं.वि. सहकलम ५, १५ पर्यावरण कायदा १९८६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोस्टे नरखेड अंतर्गत पेठ विभाग नरखेड येथे दिनांक १०/०१/२०२४ रोजी **आरोपी नामे— नरेश विठ्ठलराव बाराई, वय ५३ वर्ष, रा. नरखेड पेठ विभाग** याचे घराचे कायदेशिररित्या झडती घेतली असता त्यांचाकडे प्रतीबंधित नायलॉन मांजा मिळुन आला १ मोनो काईट कंपनीची मांजा चक्री ज्याला नायलॉन मांजा गुंडाळलेला आहे ५०० ग्रॅम जप्त मालाची संख्या प्रती नग किंमत ५००/—रु प्रमाणे एकुण किमत २५००/—रु चा माल जप्त करण्यात आला.

पोस्टे कोंढाळी अंतर्गत मौजा कोंढाळी येथे दिनांक १०/०१/२०२४ रोजी पोस्टे कोंढाळी येथील स्टाफ हे पेट्रोलींग करीत असता मुखबीर द्वारे मिळालेल्या माहिती वरून **आरोपी नामे— करण उर्फ किरण फुलचंद शाहु वय ४८ वर्ष, रा. उमाटे नगर कोंढाळी** याची झडती घेतली असता आरोपी जवळ २ नग मोठी चक्री किंमती ३०००/— रू व १ नग नायलॉन मांजाची लहान चक्री किमती अंदाजे ५००/— रू असा एकुण ३५००/— रू. चा मुद्देमाल मिळुन आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन केळवद येथील सहायक पोलीस निरीक्षक राकेश साखरकर, पोलीस स्टेशन कोंढाळी येथील सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे, पोलीस स्टेशन नरखेड येथील सहायक पोलीस निरीक्षक कृष्णा तिवारी, पोलीस स्टेशन अरोली येथील सहायक पोलीस निरीक्षक निशांत फुलेकर यांनी पार पाडली.




## घरफोडी करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांना अटक
## पोलीस स्टेशन काटोलची कारवाई

पोलीस स्टेशन काटोल नागपुर (ग्रा.) येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाने मा. वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली १) अप क्र. ११/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ भा.द.वि, २) अप क्र. १४६१/२०२३ कलम ४५४, ४५७, ३८० ३४ भादवि. ३) अप क्र. १४५७/२०२३ कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ भादंवि, ४) अप क्र. १३०८/२०२३ कलम ४५४ ,३८०, ३४ भादवि. ५) अप. क्र. ०८/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ भादवि या गुन्हयातील अज्ञात आरोपीचा कसोशीने शोध घेवुन **आरोपी नामे १) राहुल रावभाजी उईके, वय १९ वर्ष रा. मरामाय नगर काटोल २) सोनु धर्मराज गुजवार, वय २५ वर्ष रा. गळपुरा काटोल, ३) हेमंत साहेबराव धुर्वे, वय २७ वर्ष रा. गळपुरा काटोल ४) संदीप उर्फ रोशन रमेश वरघट वय २८ वर्ष रा. काटोल ५) हेमंत साहेबराव धुर्वे वय २७ वर्ष रा. काटोल** यांना ताब्यात घेवुन त्याच्याकडे कौशल्यपुर्ण तपास करुन त्याने काटोल शहरात घरफोडीचे ०५ गुन्हे उघड करुन आरोपीतांकडुन सोने, चांदीचे दागीने किंमती १,०४५२०/—रुपये नगदी १२,१५८/— रुपये व दोन मोटर सायकली किंमती ५०,०००/—रुपये असा एकुण १,६६,६७८/— रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात काटोल गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आलेले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात श्री. बापु रोहम उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल श्री. निशांत मेश्राम ठाणेदार काटोल गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय कोलटे, पोलीस हवालदार कैलास उईके, पोलीस नायक भुषन मदनकर, पोलीस अंमलदार गौरव बखाल यांनी पार पाडली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर